( सोबत रस्ता सुरक्षा अभियान 2015 अंतर्गत कार्यक्रम राबविण्याबाबत शासन उच्च व तंत्रशिक्षण परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1111/(प्र.क्र.1/15) समन्वय, दिनांक 2.1.2015 ची प्रत )

क्रमांक : 10/एनजीपी/2015/माहिती/ 434

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. 1967,
मुंबई 400 001

दिनांक : - 2 FEB 2015

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

   त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी / पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निर्दशनास आणून त्याबाबत अंमलबजावणी करण्याच्या सूचना तात्काळ द्याव्यात. तसेच त्याबाबतचा अहवाल विनाविलंब सादर करावा.

2. कार्यासन क्रमांक 16, 2 मुख्य कार्यालय, मुंबई.

( डॉ सुभाष महाजन )
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय, नागपूर.
क्र :—तंशिसं/विकाना/पदविका/२०१५/ 413
दि. - 6 FEB 2015

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विनाअनुदानित
पदवी/ पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
नागपूर विभाग .

त्यांना कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या शासन निर्णयासंचालनालयाचे सदर पत्रातील सूचनांची नोंद घेऊन त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर

प्रत:— प्रोग्रामर , यांनी सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

रस्ता सुरक्षा अभियान २०१५ अंतर्गत कार्यक्रम राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-१११९/(प्र.क्र.१/१५)/समन्वय
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०२ जानेवारी, २०१५.

वाचा -

शासन परिपत्रक, गृह ( परिवहन ) विभाग क्रमांकः एमव्हीडी १२१४/प्र.क्र.१८/परि-२, दि.२४ डिसेंबर, २०१४.

शासन परिपत्रक -

मोटर वाहन अपघातास आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून दि.११.१.२०१५ ते दि.२५.१.२०१५ या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान २०१५ राज्यभर राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती व गांभीर्य निर्माण करण्यासाठी " रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत " संदर्भाधिन दि.२४.१२.२०१४ रोजीच्या परिपत्रकासोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे ठरविलेल्या कृती कार्यक्रमाची/मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी संबंधित विभागाच्या खाते प्रमुखांनी करावी असे गृह ( परिवहन ) विभागाने सूचित केले आहे. त्यानुसार रस्ता सुरक्षा अभियान पंधरवडयादरम्यान महाविद्यालयीन स्तरावर जनजागृतीसाठी खालील कार्यक्रम राबविण्याचे शासनाचे आदेश आहेत. :-

१) चर्चासत्राचे आयोजन :- सर्व महाविद्यालयांमध्ये वाहतुकीचे नियम व सुरक्षिततेच्या दृष्टीने चर्चासत्र भरविणे तसेच व्याख्यानमाला व निबंध स्पर्धेचे आयोजन करणे. एनसीसी /एनएसएसच्या माध्यमातुन रस्ता सुरक्षा अभियान विद्यार्थ्यांमध्ये पोहचविणे.

२) महाविद्यालयांमध्ये जनजागृती :- निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा, शिबिरे, मेळावे, परिसंवाद यांचे आयोजन करुन सुरक्षित वाहन चालविणेबाबत जनजागृती करणे.

३. वरील आदेश /कार्यक्रम सर्व संबंधितांनी त्यांचे अधिनस्त शासकीय /निमशासकीय /खाजगी शिक्षण संस्थांच्या निदर्शनास आणून, त्याचे पालन करावे व रस्ता सुरक्षा अभियान यशस्वी करावे.

४. या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व संचालकांनी वरील आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून, त्यांना त्याबाबत अंमलबजावणी करण्याच्या सूचना तात्काळ द्याव्यात. तसेच याबाबतचा अनुपालन अहवाल दि.०५/०२/२०१५ पर्यंत शासनास सादर करावा.

५. या विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विद्यापीठांनी वरील आदेश त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून, त्यांना त्याबाबत अंमलबजावणी करण्याच्या सूचना तात्काळ द्याव्यात. तसेच याबाबतचा अनुपालन अहवाल दि.०५/०२/२०१५ पर्यंत शासनास सादर करावा.

पत्र प्राप्त झाले
- 5 JAN 2015
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०१०२१६१३२३८३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(का.रा.पिळणकर)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव ( उच्च व तंत्र शिक्षण विभाग ) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. उप सचिव, गृह ( परिवहन ) विभाग, मंत्रालय, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, ३० वा माळा, मुंबई.
७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. संचालक, प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
१४. विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, मुंबई.
१५. सर्व सह सचिव /उप सचिव /अवर सचिव /कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, यांना त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांना कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्याबाबत.
१६. निवडनस्ती.